# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १५/०३/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक १५/०३/२००७ रोजी सभा सुचना क्र. ३२ दि. ०९/०३/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| २) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ४) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आजच्या सभेत सर्वांचे स्वागत आणि आजची मिटींग आपण खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी अपेक्षा व सचिवांनी सभेला सुरूवात करावी.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २०९ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

माझे वरून संभांषण आहे. ज्याच्यामध्ये खालची लाईन कधी कर्ज उभारणी करून घेणार पान क्र. ३३ वर माझे वरून भाषण आहे की, ठराव असे टाकू शकत नाही. त्यामुळे मतदानाचा टाकु शकत नाही. पान नं. ३४ वर खासदारांच्या महापालिकेने किती निधी दिला असेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हयाच्यामध्ये मागे असे ठरले होते की, आपण मिरा रोडला जे हॉस्पिटल बांधतो. ते मिरा भाईंदर महानगरपालिका बांधत आहे. आणि विधान सभेचे आमदार आहे त्यांनी एवढे पैसे दिले हयांनी एवढे पैसे दिले.

**मा. आयुक्त :-**

दिलेले आहे बोर्ड तयार करायला दिलेले आहे आणि ज्यांनी ज्यांनी निधी दिलेला आहे त्यांची नावे दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब असा पिक्चर तयार होतो की, हे जे पर्टीक्युलर हॉस्पिटल आहे ते फक्त एका पर्टीक्युलर माणसाने तयार केलेले आहे. तर तसे तयार न होता. कारण ही वास्तु मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे.

**मा. आयुक्त :-**

मला ते बोलले.

**मा. सभापती :-**

बोर्ड बनवायला दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बोर्ड लागते की नाही हया पहिले बोर्ड टीकते की नाही हे बघा.

**मा. सभापती :-**

टिकेल. पहिला बोर्ड येवू द्या नंतर बघा.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील हयांनी प्रकरण क्र. २०९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २०९ :-**

दि. २२/११/२००६ (तहकूब) व दि. २४/११/२००६ (दि. २२/११/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २०७ :-**

दि. २२/११/२००६ (तहकूब) व दि. २४/११/२००६ (दि. २२/११/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.          अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २१० चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सदर विभागाचा गोषवारा आलेला नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

खुलासा करु द्या.

**मा. सभापती :-**

ते खुलासा करतात.

**शिवाजी बारकुंड :-**

गोषवारा दिलेला होता. परंतु, ३ दिवसामध्ये पाणी पुरवण्याच्या बऱ्याच कामामध्ये मी स्वतः ३ दिवस टेमघर आणि ठाणे येथे होता. त्यामुळे गोषवारा दिला नाही. त्यामुळे पुढच्या मिटींगमध्ये व्यवस्थित गोषवारा देवून तो विषय पुढे घेण्यात यावा.

**रतन पाटील :-**

साहेब, विषय हॉस्पीटलचा होता.

**शशिकांत भोईर :-**

पाणी पुरवण्याच्या २१० चा की २११ चा गोषवारा दिलेला नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

अवलोकन आहे.

**नगरसचिव :-**

२१० चा गोषवारा नाही.

**मा. सभापती :-**

अवलोकन आहे पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २१० :-**

पाणी पुरवठा विभागातील निविदांना मंजूरी देणे.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २११ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यात निविदा आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील मा. आयुक्त साहेब यांनी मंजुर दिलेल्या प्रस्तावाचे तपशिल खालीलप्रमाणे अ.क्र. १ - भाईंदर पूर्व प्रभागातील बी.पी. रोड येथील जुन्या ए.सी. लाईनवरील कनेक्शन नविन बीडाच्या जलवाहिनीवर स्थलांतर करणे. अंदाजित रक्कम २ लाख ३५ हजार ७३८ रु., कंत्राटाचे नावे - एस. एन. एन्टरप्रायजेस, मंजुर दर १.६१ यात कोणती लाईन

जेव्हा शिफ्ट केली. तर त्याचा खुलासा स्पष्ट केला तर बरं होईल. ए.सी.ची लाईन शिफ्ट कुठे केली? आणि कोणत्या लाईन त्याच्यात ट्रान्सफर केला. ह्याचे थोड स्पष्टीकरण द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या वर्षी बी.पी. रोड आणि नवघर रोडच्या टाकीवरचे झोन खारीगावच्या टाकीवर शिफ्ट केले. नवघरच्या टाकीवरचे झोन मागच्या वर्षी निशांत जाधव असताना हे काम झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

स्थलांतर करणे म्हणजे कोणते काम?

**शिवाजी बारकुंड :-**

क्रॉस कनेक्शन. स्थलांतर करणे म्हणजे झोन असे त्याला नाव आहे. झोन आपण केले. नवघरच्या टाकीवर होते आणि गोडदेवच्या टाकीवर झोन जास्त होत म्हणून आपण ते क्रॉस करुन ते केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ए.सी. लाईनवरती ज्या लाईट्स होत्या त्या बिडाच्या लाईनवरती आणल्या.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे तुम्ही ए.सी. लाईन बंद केली.

**शिवाजी बारकुंड :-**

हो आणि तो झोन आपण नवघरच्या टाकीवर घेतला.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे गेल्या वर्षीचे अवलोकन आज घेतला.

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी पुरवठा सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अवलोकन मंजुर.

**मा. सभापती :-**

मंजुर.

**प्रकरण क्र. २११ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव | मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पुर्व) प्रभागातील बी.पी. रोड येथे जुन्या ए.सी.लाईन वरील कनेक्शन नविन बिडाच्या जलवाहीनीवर स्थलांतरीत करणे | रू. २,३५,७३८/- | मे. एस.एन. एंटरप्रायजेस | १.६१% |
| २. | जनता नगर (काशी) येथे एम.एस. लाईन पुरविणे व टाकणे. | रू. ९,१७,४६२/- | मे. एस.एन. एंटरप्रायजेस | ४.९०% |

अ.क्र. २ सर्व्हिस व्हॉल्वसाठी चेकनट स्पिंडलचा पुरवठा करणे. याकामा करिता मे. मे. एस.एन. एंटरप्रायजेस यांची निविदा मंजुर करण्यात आली असून मंजुर दर खालील प्रमाणे आहेत.

| तपशिल (व्यास) | परिमाण (कि.ग्रॅम) | मंजुर दर (प्रति कि.ग्रॅम) |
|---|---|---|
| अ) चेकनट | | |
| ०८० मि.मि. ते २५० मि.मि. व्यास | १३२.३० | रू. ९४३/- |
| ०८० मि.मि. ते २५० मि.मि. व्यास | ६८९.०० | रू. ८४३/- |
| ब) स्पिंडल | | |
| ०८० मि.मि. ते २५० मि.मि. व्यास | ४८.८० | रू. ९४०/- |
| ०८० मि.मि. ते २५० मि.मि. व्यास | २६१.२५ | रू. ८३७/- |

मजुर संस्थांना देण्यात आलेला कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मा. आयुक्त यांच्या बंगल्या करिता सौर उर्जेद्वारे गरम पाणी करण्याची व्यवस्था करणे | रू. २,३५,७३८/- | श्री. सदगुरू कृपा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. कल्याण जि. ठाणे |
| २. | मा. महापौर यांच्या बंगल्या करिता सौर उर्जेद्वारे गरम पाणी करण्याची व्यवस्था करणे | रू. २,४४,२४५/- | श्री. गंगा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. उल्हासनगर जि. ठाणे |
| ३. | गोडदेव जलकुंभाच्या आवारात कोबा करणे | रू. ४,६४,३८७/- | कल्पतरू मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. ठाणे जि. ठाणे |
| ४. | उत्तन येथील जलकुंभाची दुरूस्ती करणे | रू. ४,७१,०५३/- | दौलत मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापुर जि. ठाणे |

सबब उपरोक्त प्रस्तावांचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २१२ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, कमिशनर साहेब बसलेले आहेत आणि या डिपार्टमेन्टचा अधिकारी नाही.

**नगरसचिव :-**

त्यांना अजेंडा दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ह्याच्यामध्ये एक सजेशन आहे की, आपल्या भाईंदर पश्चिमेला जो धक्का आहे. साहेब, तिथे गणपती उत्सव, नवरात्री उत्सवची दरवर्षी मिरवणूक जाते. तिथे परत तिथे गणगौर उत्सव होतो आणि तिथे नेहमी काही ना काही फंक्शन असतात ह्याच्यानंतर तिथे लोक सकाळी मॉर्निंग वॉकसाठी पण जातात तर तो रस्ता आहे. तो फक्त खराब झालेला आहे. तर साहेब, त्या रस्त्यावर डांबरीकरण झाले तर बरे होईल. कारण पावसाला चालू झाला तर परत रस्ता खराब होईल आणि परत डांबरीकरण करायला लागेल आणि बजेट वाढेल. त्यामुळे साहेब हे आता केले तर बरे होईल

**मा. आयुक्त :-**

रेल्वेने आपल्याकडे प्रतिबंध केलेले आहे. तर आपण रेल्वेला पुन्हा पत्र पाठवून त्यांना विनंती केलेली आहे की, पुर्व परंपरेप्रमाणे त्या ठिकाणी ह्या शहरामध्ये जे काही उत्सव आहे. ते उत्सव तसेच सुरु ठेवावे. अशाप्रकारे त्यांना इन्फॉर्म करायचे आहे आणि आपण त्यांना पत्रसुध्दा पाठवलेले आहे. त्यांनी जर आपल्याला मौखिक परवानगी दिली तरी आपण करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चालेल.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. २१२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. २१२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सवातंर्गत श्री. गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, इद, गणगौर, कार्तिक पोर्णिमा, छटपुजा, वेलंकनी उत्सव, जनता दरबार व इतर सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता विविध व्यवस्था करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. २०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीची एकूण लोकसंख्या सुमारे ८.०० लाख एवढी असून शहरात सर्वधर्मिय नागरिक एकत्रितपणे राहत आहेत. सदर विविध धर्मिय नागरिकांमार्फत विविध सण एकत्रितरित्या मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. सदर सणामध्ये प्रामुख्याने श्री गणेशोस्तव, गुजराथी समाजाचा नवरात्र उत्सव, मुस्लिम समाजाचा इद, राजस्थानी समाजाचा गणगौर, जैन समाजाचा कार्तिक पोर्णिमा, छटपुजा,

ख्रिश्चन समाजाचा वेलंकनी उत्सव इ. सण साजरे केले जातात. तसेच पालकमंत्री यांच्या जनतादरबाराच्यावेळी सुद्धा विविध व्यवस्था करावी लागते.

श्री. गणेश विसर्जनाकरिता शहरातील सर्व तलाव, भाईंदर पुर्व व पश्चिम धक्का, उत्तन, घोडबंदर घाट येथे मोठ्याप्रमाणावर गर्दी होत असते. सदर ठिकाणी लाईटस, हॅलोजन, लाकडी रेलिंग, उंच स्टेज, मंडप, स्वागत कमानी, गेट, जनरेटर, टेबल, खुर्च्या, स्पीकरसेट, बोटी, लाकडी तराफे, निर्माल्य विसर्जनाकरिता टाक्या पुरवठा करणे इ. व्यवस्था करावी लागते. इतर समाजाच्या कार्यक्रमावेळी देखिल भाईंदर पुर्व व पश्चिम धक्का येथे वरील प्रमाणेच व्यवस्था करावी लागते. महानगरपालिकेमार्फत सदर कामे दरवर्षी वार्षिक मुदतीच्या निविदा मागवून करून घेण्यात येतात. सन २००६-०७ या वर्षाकरिता मागितलेल्या ठेव्याची मुदत ही दि. ३१/०३/२००७ रोजी संपत असल्यामुळे तत्पुर्वी नव्याने निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर ठरावाची इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.          अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. साहेब, याबाबत ठराव झालेला आहे. तर त्याबद्दल माझी अशी सुचना आहे की, मिरा भाईंदरमध्ये गणेश उत्सव किंवा दुर्गा अष्टमी ह्या संदर्भातील आमच्याकडे एकच चौपाटी आहे आणि तेवढा पूर्ण लोड हा नवघर आणि बी.पी रोडवर पडला जातो. तर, आपल्याला विर्सजनाची दुसरी वय्वस्था करता येईल. अशा पध्दतीने मा. आयुक्त साहेबांनी त्या संदर्भात कुठेतरी प्रयत्न करा की नवघर रोडवरच्या एका बाजूला लोड येतो आणि जनजीवन इतकं विस्कळीत होते. तर त्याची दुसरी पर्यायी व्यवस्था होत असेल. फक्त विर्सजनापुरती.

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर पर्यायी दुसरा काय मार्ग आहे?

**मा. आयुक्त :-**

शहरामध्ये ज्या ठिकाणी सार्वजनिक गणेश उत्सव असतो तर ते लोक ट्रेन झालेले आहे. म्हणजे कसे असते की, जे मोठे पाच दिवसांचे गणपती असतात, सात दिवसाचं असतील किंवा दहा दिवसांचे असतील. तर ते एकच रुटने त्या मोठ्या चौपाटीवर विर्सजनासाठी येतात. त्याच्यापैकी काही पश्चिमेला आहे, काही पूर्वेला आहे. पण, पूर्वेवरती जास्त लोड येतो. एवढ्या मोठ्या प्रमाणावरती आपल्याला संपूर्ण यंत्रणे उभी करावी लागतील. आज आपल्याजवळ एक्झेस्टींग जागा आहे किंवा आपण त्याठिकाणी ज्या-ज्या डेव्हलपमेन्ट केलेल्या आहेत. त्याचा तसा त्याठिकाणी वापर चांगला होतो.

**रतन पाटील :-**

त्याच्यामध्ये आणखीन एक सुचवतो. एस. एन. च्या मागून जो रोड आहे. तो तसा जॉईन्ट करा. कारण मिरारोड वरुन येणारे गणपती येथे आहेत. मिरारोड वरुन ते डायरेक्ट आर.एन.पी. पार्क आणि जेसलपार्क तर्फे मार्गे येतील. बी. पी. रोडला जामची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

तरी पण मागच्या वेळेला आपली सगळी गणेश उत्सव मंडळ आहेत. त्या मंडळांना विंनती केली होती की, ज्यांना ज्य ठिकाणच्या जवळ विर्सजनाचा जो भाग आहे त्या ठिकाणी तुम्ही विर्सजन करा.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे येत नाही. म्हणून माझी ही सुचना आहे की, तशा पध्दतीने लॉईन्ट केले. तर ब-याचश्या दोन्ही रोडवर पडणारा ताण कमी होईल. आपण त्याची पाहणी करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. त्याची पाहणी करुन घेवून. आपल्या स्थायी समितीला अहवाल देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, मला हॉस्पीटलच्या संदर्भात बोलायचे आहे. आपण कनकिया येथे महापालिकेचा जो भुखंड आहे त्याच्यावर आपण ३०० बेडचे हॉस्पीटल बांधणार आहोत. तर त्या संदर्भात आपली प्रोसेस, उपाययोजना काय चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी आपल्याकडे प्लॅन सबमिट केलेले आहे. त्यांचे काम चालू आहे.

**रतन पाटील :-**

लवकरात लवकर करा.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या आठवड्यामध्ये मी तुम्हाला देतो.

**रतन पाटील :-**

चालेल.

**मा. सभापती :-**

मिटींग संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याचे वेळ :- दु. ११.४० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**